# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २४/११/२०२३ (शुक्रवार)

---

## मृत व्यक्तीचे ओळखीबाबत शोध पत्रीका

**पो.स्टे. कुही :–** अंतर्गत ३० कि. मी अंतरावरील मौजा मटकाझरी शिवार येथे दि. २७/१०/२०२३ चे सकाळी ०८.३० वा. पुर्वी फिर्यादी नामे– गोविंदा उर्फ चिनलाल बळीराम उईके हे आपल्या शेतामध्ये काम करणेकरीता जात असतांना त्यांना मटकाझरी ते चिमनाझरी रोडच्या व ईश्वर खोब्रागडे याच्या शेताचा दरम्यान असलेल्या कॅनलचा पुलाखाली एका अनोळखी पुरूष इसमाचा मृतदेह कुजलेल्या स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादीने दिलेल्या तोंडी रिपोर्ट वरूण पोस्टे कुही येथे अप क्र. ७०१/२३ कलम ३०२ भादवी प्रमाणे गुन्हा नोंद करूण तपासात घेतला आहे.

**मृतकाचे वर्णन–**

लिंग पुरूष, वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष, उंची ५ फुट 6 इंच केस काळे बांधा – मजबूत अंगात कपडे, ३५ ते ४० वर्ष वयाचा अंगात फिक्कट हिरव्या रंगाचे काळया पांढऱ्या रंगाचा चौकोणी रेषा असलेले शर्ट व त्याखाली लाल काळया रंगाची बनियान खाली फिक्कट निळया रंगाचा जिन्स पेन्ट व त्या खाली लाल रंगाची अडरवेअर काळया रंगाची दाढी मिशी केस वाढलेले.

याबाबत कुणीही ओळखत असल्यास कृपया पोलीस स्टेशन कुही येथील श्री महेश भोरटेकर पोलीस निरीक्षक पोस्टे कुही मो.नं. 9823264005 किंवा श्री हरिहर सोनकुसरे पोलीस उपनिरीक्षक पोस्टे कुही मो क्र. ९०२१५४२९१८ या मोबाईल क्रमांकावर कृपया संपर्क साधावा.





## चरत असलेल्या बक–या चोरी

**पोलीस स्टेशन काटोल** :– अंतर्गत एम आय डी सी डोंगरगाव शिवार काटोल ५ किमी पुर्व, यातील फिर्यादी याच्याकडे एकुण ०६ बक–या व ०१ बोकड असे आहे. दिनांक २३/११/२३ चे १२/०० वा ते १२/२० वा दरम्यान, फिर्यादीचा मुलगा एम.आय.डी.सी. डोंगरगाव शिवारात बक–या चारण्याकरीता गेला असता, बक–या चारण्यासाठी सोडुन तो तेथील एका झाडाखाली बसुन मोबाईल बघत होता, काही वेळाने त्यांने बघीतले असता त्याचेकडील ०३ बक–या व ०१ बोकड हे चरतांना तिथे दिसले नाही, आजुबाजुला शोध घेतला असता ३ पांढ–या रंगाच्या गाभण बक–या किंमती प्रत्येकी ८०००/– रूपये प्रमाणे **एकुण २४,०००/– रूपये व ०१ पांढ–या रंगाचा बोकड किंमती ९०००/– रूपये असे एकुण ३३,०००/– रूपयाचा असे तिन बक–या व एक बोकड दिसुन आले नाही**.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रामकृष्ण निवृती दाबेकर वय ५० वर्षे रा.एम.आय.डी.सी. डोंगरगाव ता. काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपी विरूध्द कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो ना संतोष राठोड पो.स्टे. काटोल मो. ८६६८२८४५६८ हे करीत आहे.